लोकमत – दि. १३ फेब्रुवारी, २०२०

# सांस्कृतिक व शैक्षणिक प्रगतीचा प्रसार करावा

## डॉ. रवींद्र शिसवे : विकासाच्या प्रवाहात येण्याचे काश्मिरी युवकांना आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क



**पुणे :** समाज माध्यमे आणि काही समाजविघातक शक्तींकडून पसरविल्या जाणाऱ्या गैरसमजुतींवर विश्वास न ठेवता काश्मिरी युवकांनी विकासाच्या प्रवाहात येण्याचे आवाहन पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी केले. आधुनिक तंत्रज्ञानाला विकासाचे माध्यम मानून त्याचा सकारात्मक कार्यासाठी उपयोग करावा, असा सल्ला दिला. तसेच काश्मिरी युवकांनी पुण्यातील सांस्कृतिक व शैक्षणिक प्रगतीचा आपल्या दऱ्याखोऱ्यांत प्रसार करावा, अशी इच्छा व्यक्त केली.

केंद्रीय गृहमंत्रालय आणि युवा कार्यक्रम-क्रीडा मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने पुणे शहरात नेहरु युवा केंद्र, पुणे तर्फे कश्मिरी युवा आदान-प्रदान कार्यक्रमाचे आयोजन १० ते १६ फेब्रुवारी २०२० दरम्यान करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाट मंगळवार (दि.११) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख सभागृहात झाले.

दरम्यान भारती विद्यापीठाचे कुलगुरू माणिकराव साळुंखे यांनी काश्मिरी युवकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येण्याचे आवाहन केले.

तसेच केंद्रीय काश्मी विद्यापीठातील आपल्या आठवणींना उजाळा देताना काश्मिरी युवका असलेल्या जिद्द , चिकाटी , कौशल्य याचे विशेष कौतुक केले आणि काश्मीरमधील विविध उपलब्ध संधींचा उलगडा केला. तसेच पुणे येथील भारती विद्यापीठ काश्मिरी युवकांना ज्ञान व कौशल्य प्राप्तीसाठी नेहमीच प्रयत्नशील असेल, अशी ग्वाही दिली.

### आतंकवाद प्रभावित जिल्ह्यांतील युवकांचा सहभाग

- या कार्यक्रमात जम्मू काश्मीर राज्यातील अनंतनाग, कुपवाडा, बारामुल्ला, बडगाम, श्रीनगर, पुलवामा या आतंकवाद प्रभावित जिल्ह्यातून १३० युवक - युवती तसेच पुणे जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था सहभागी झाल्या आहेत.
- या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश जम्मू आणि काश्मीर खोऱ्यातील तरुणांना महाराष्ट्रातील संस्कृती, कला, विज्ञान, शैक्षणिकदृष्ट्या औद्योगिक विकास व बदलती जीवनशैली यांची ओळख करुन देऊन युवकांना मुख्य व राष्ट्रीय प्रवाहात आणणे आणि त्यांना देशाचे जबाबदार नागरिक बनवणे असा आहे.
- त्यांना शिक्षण व रोजगाराच्या संधी महाराष्ट्र मोठ्या शहरांमध्ये मिळवून देण्यासाठी नेहरु युवा केंद्र विशेष प्रयत्न करण्यात येणार आहे, असे मत जिल्हा युवा समन्वयक यशवंत मानखेडकर यांनी व्यक्त केले.

प्रभात – दि. ११ फेब्रुवारी, २०२०

# महिलांना सक्षम, स्वावलंबी करण्याचा प्रयत्न : रितू छाब्रिया

## विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान : फिक्की एफएलओ पुणे चॅप्टरचा पुढाकार

**प्रभात वृत्तसेवा**



पुणे : फिक्की एफएलओ पुणे चॅप्टरने आपल्या पाचवा वर्धापनदिनानिमित्त प्रतिभावान, निपुण महिलांना विशेष पुरस्कारांनी गौरविले. यावेळी संस्थेच्या चेअरपर्सन रितू प्रकाश छाब्रिया, कौशल्य विकास आणि उद्योगमंत्री नवाब मलिक, राजेंद्र जगदाळे आदी.

**पुणे, दि. १० -** फिक्की एफएलओ पुणे चॅप्टरने आपल्या पाचवा वर्धापनदिनानिमित्त व्होकेशनल अॅवार्डस स्किल अँड आंत्रेप्रेन्युअरशिपचे आयोजन केले. प्रतिभावान, निपुण महिलांचा सन्मान करण्यासाठी हे विशेष पुरस्कार देण्यात आले. प्रमुख पाहुणे राज्याचे कौशल्य विकास आणि उद्योग मंत्री नवाब मलिक, सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कचे महासंचालक राजेंद्र जगदाळे आणि एफएलओ चॅप्टर पुणेच्या चेअरपर्सन रितू प्रकाश छाब्रिया यांच्या हस्ते विविध सरकारी विभागातील गुणवंत महिलांना तसेच एफएलओ सदस्यांना स्पेशल कॅटेगरी चेअरपर्सन्स अॅवार्डने सन्मानित केले.

यावेळी खडकी येथील पॅराप्लेजिक रिहॅबिलिटेशन सेंटरच्या चार पॅराप्लेजिक वीरांनी आपली कौशल्ये प्रदर्शित करून सर्वांच्या मनात त्यांच्याबद्दल आदर निर्माण केला.

सरकारी रुग्णालय, डाक विभाग, पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, रेल्वे, पोलीस, पशुपालन या क्षेत्रातील गुणवान महिला कर्मचाऱ्यांना सन्मानित करण्यात आले. यात स्वप्ना गोरे, प्रतिभा जोशी, भारती दासवाणी, राजश्री कोराके, डॉ. मोनिका मुलिक, डॉ. जयश्री कटारे, राजश्री घाटगे, सुप्रिया साळुंखे, सुनिता सेवकर, सुमन धायमुक्ते, रूपाली सरतापे यांचा समावेश आहे.

यावेळी रितू छाब्रिया म्हणाल्या, 'यंदा आम्ही आमच्या पुणे चॅप्टरचा पाचवा वर्धापनदिन साजरा करत आहोत आणि या निमित्ताने शहरातील आजवर अनुल्लेखित राहिलेल्या महिलांच्या गुणांचा सन्मान करताना आम्हाला आनंद होत आहे.

यावेळी मी माझ्या संपूर्ण टीमचे आभार मानते. भविष्यातही आमचे हे कार्य सुरू राहील. समाजाच्या सर्व स्तरातील महिलांना सक्षम आणि स्वावलंबी बनवण्यासाठी संधी पुरवत राहू.'

या कार्यक्रमास महाराष्ट्राच्या वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचानालयाचे अतिरिक्त सहसंचालक डॉ. अजय चंदनवाले आणि डॉ. डी. डी. परकाले, जॉइंट कमिशनर ऑफ ॲनिमल हसबंडरी गोवा उपक्षेत्राचे मेजर जनरल नवनीत कुमार हे उपस्थित होते.

# पुणे की तरह सांस्कृतिक-शैक्षणिक प्रगति कश्मीर में भी करें

## पुलिस सह आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे का पुणे में पढ़ने वाले कश्मीरी छात्रों से अनुरोध

**पुणे, 12 फरवरी (आ.प्र.)**

पुणे में पढ़नेवाले कश्मीरी युवकों को पुणे की सांस्कृतिक एवं शैक्षणिक विरासत का कश्मीर घांटी में प्रसार करना चाहिए, यह अनुरोध पुणे के पुलिस सह आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे ने केंद्रीय गृह मंत्रालय एवं युवा तथा क्रीड़ा मंत्रालय के संयुक्त तत्वावधान में जिलाधिकारी कार्यालय द्वारा आयोजित नेहरु युवा केंद्र एवं कश्मीरी युवक आदान-प्रदान कार्यक्रम का मार्गदर्शन करते हुए किया. इस कार्यक्रम का उद्घाटन भारती यूनिवर्सिटी के कुलगुरु डॉ. माणिकराव सालुंखे ने किया.

इस कार्यक्रम में जम्मू-कश्मीर के अनंतनाग कुपवाड़ा, बारामुल्ला, बडगाम, श्रीनगर और पुलवामा जिले से आये लगभग 130 युवक युवतियां शामिल हुए. यह जिले उग्रवादियों से पीड़ित हैं. इस कार्यक्रम का उद्देश जम्मू-कश्मीर घांटी के युवकों को महाराष्ट्र की संस्कृति, कला, विज्ञान, शैक्षणिक, औद्योगिक क्षेत्र का विकास और बदलती जीवनशैली आदि की जानकारी देकर जम्मू एवं कश्मीर राज्य के युवकों को राष्ट्रीय प्रवाह में लाना है. कश्मीरी युवकों को जिम्मेदार नागरिक बनाकर उन्हें शिक्षा एवं रोजगार के अवसर महाराष्ट्र में दिलाने का नेहरु युवा केंद्र के माध्यम से प्रयास किया जायेगा. ऐसा प्रतिपादन जिला युवा समन्वयक यशवंत मानखेडकर ने किया.



**जिलाधिकारी कार्यालय में आयोजित कश्मीरी युवा आदान-प्रदान कार्यक्रम का उद्घाटन करते हुए डॉ. माणिकराव सालुंखे, साथ में पुलिस सह आयुक्त डॉ. रविंद्र शिसवे, निवासी उपजिलाधिकारी डॉ. जयश्री कटारे एवं अन्य.**

अपने उद्घाटन भाषण में डॉ. माणिकराव सालुंखे ने कश्मीरी युवकों को शिक्षा के मुख्य प्रवाह में आने का अनुरोध किया. तथा कश्मीर युवकों की जिद्द कुशलता आदि गुणों की प्रशंसा की और कहा कि, इसके लिए भारती विद्यापीठ (यूनिवर्सिटी) कश्मीरी युवकों को ज्ञान एवं कौशल्य की प्राप्ती हेतु हमेशा प्रयास करता रहेगा.

पुणे के पुलिस सह आयुक्त डॉ. रविंद्र शिसवे ने अपने मार्गदर्शक भाषण में कहा कि, समाज माध्यम (सोशल मिडिया) और कुछ समाज विरोधी अफवाहे फैलायी जाती हैं उस पर विश्वास नहीं करें, नजरअंदाज करें. साथ ही आधुनिक टेक्नालाजी को विकास का माध्यम मानकर उसका सकारात्मक इस्तेमाल करने की सलाह दी.

इस अवसर पर प्रमुख अतिथि के रूप में भारती विद्यापीठ के कुलगुरु माणिकराव सालुंखे, पुलिस सह आयुक्त डॉ. रविंद्र शिसवे के अलावा अपर जिलाधिकारी साहेबराव गायकवाड, निवासी उपजिलाधिकारी डॉ. जयश्री कटारे, पूना कालेज के प्राचार्य अन्वर शेख, सीआपीएफ के सहायक कमांडेंट तानाजी केसरकर आदि मान्यवर उपस्थित थे. कार्यक्रम सफल बनाने हेतु यशवंत मानखेडकर ने विशेष प्रयास किये.

लोकसत्ता – दि. ८ फेब्रुवारी, २०२०

# ‘मल्टिॲक्टिव्हिटी सेंटर’द्वारे पोलिसांच्या कलागुणांना संधी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** ‘पोलीस यंत्रणेतही अनेक हौशी छायाचित्रकार आणि कलाकार आहेत. त्यामुळे पोलिसांमधील सर्वच कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी पुणे पोलिसांतर्फे शिवाजीनगर मुख्यालयाजवळ मल्टिॲक्टिव्हिटी सेंटर उभे करण्यात येत आहे,’ अशी माहिती पोलीस आयुक्त के. वेंकटेशम यांनी शुक्रवारी दिली.

‘फोटोग्राफर्स ॲट पुणे’ या समूहातर्फे आयोजित दृष्टिकोन या प्रदर्शनाच्या उद्‌घाटनावेळी वेंकटेशम बोलत होते. कवी-गीतकार वैभव जोशी, शशांक पाठक, सुनील जुनेजा, अभिजित मुथा, ‘फोटोग्राफर्स ॲट पुणे’चे सौमित्र इनामदार, चैतन्य खिरे, प्रसाद शिरगावकर, आनंद जाधव, भूषण माटे आदी या वेळी उपस्थित होते. यंदा या प्रदर्शनाचे दहावे वर्ष असून, कृष्णधवल छायाचित्रे हे प्रदर्शनाचे वैशिष्ट्य आहे. एकूण ११० छायाचित्रे प्रदर्शनात मांडण्यात आली आहेत. हे प्रदर्शन रविवारपर्यंत (९ फेब्रुवारी) औंधच्या वेस्टएंड मॉलमध्ये सकाळी दहा ते रात्री दहा या वेळेत विनामूल्य पाहता येईल.

वेंकटेशम म्हणाले, ‘छायाचित्रकार त्याला आवडलेली प्रत्येक गोष्ट आपल्या कॅमेऱ्यात टिपण्याचा प्रयत्न करतो. अशीच सर्वोत्तम छायाचित्रे या प्रदर्शनात मांडण्यात आली असून त्यातला प्रत्येक क्षण मलाही त्यांच्या नजरेतून पाहता आला.’

‘प्रत्येक जण आपापल्या पद्धतीने व्यक्त होत असतो. व्यक्त होण्याची अनेक साधने असतात, शब्द, गीते, कविता, छायाचित्र हे यांपैकीच एक आहे. मात्र माध्यम कोणतेही असो, पण आपण सर्वांनीच व्यक्त व्हायला हवे. व्यक्त होण्याची कला आपण सर्वांनीच जपली पाहिजे,’ अशी भावना जोशी यांनी व्यक्त केली.



‘दृष्टिकोन’ या प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी पोलीस आयुक्तांनाही छायाचित्र काढण्याचा मोह न आवरल्याने त्यांनीही हातात कॅमेरा घेऊन छायाचित्र काढले.

SCHEDULE I
FORM A
PUBLIC ANNOUNCEMENT

पुढारी – दि. १६ फेब्रुवारी, २०२०

# पोलिसांच्या भरोसा सेलमुळे जुळली मने

## मानसिक आधाराअभावी दुभंगला होता संसार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

दोघांच्या लग्नाला जवळपास बारा वर्षे होत आलेली. सुरवातीची ७-८ वर्ष त्यांचा दोघांचा संसार बरा चालला होता. त्यांना एक दहा वर्षांचा मुलगाही होता. परंतु, दारूचे व्यसन आणि मानसिक आधार न मिळाल्याने त्यांचा संसार दुभंगला. भरोसा सेलच्या माध्यमातून दोघांचेही समुपदेशन करून पुन्हा मने जुळविण्यात पोलिसांना यश आले असून, दोघांबरोबरच मुलाच्या चेहऱ्यावरही आनंद दिसून येत आहे.

बारा वर्षे लग्नाला झाल्यानंतर संसार व्यवस्थित सुरु असताना गेल्या ३-४ वर्षात त्याचं दारूचं व्यसन वाढलं होतं. त्याने दारू प्राशन केली, की तो बायकोला खूप वाईट शब्दात बोलायचा. मुलाच्या अंगावर धावून जायचा. तिच्याशी उगाचच भांडण करायचा. दारूच्या नशेत त्याने तिचा गळा आवळण्याचा प्रयत्नही केला. त्यामुळे ती खूप घाबरली आणि त्यांचा मुलगाही. त्यामुळे नाईलाजाने ती मुलाला घेऊन माहेरी निघून गेली.

तिची मन:स्थिती थोडी ठीक झाल्यावर तिने भरोसा सेलमध्ये अर्ज केला. त्याला आणि तिला भरोसा सेलमध्ये बोलावून घेण्यात आले. तिने तिची व्यथा मांडली. तर त्याने त्याची. तो म्हणाला, मला आर्थिक मंदीमुळे नोकरीत टेन्शन आहे. आम्ही राहतो त्या घरात माझे इतर नातेवाईक पण राहतात. आम्ही वेगवेगळ्या मजल्यावर राहत असलो तरी मला त्यांच्यापासून जास्त त्रास होऊ लागला. मी ते घर सोडावं म्हणून ते माझ्याशी खूप त्रासदायक वागू लागले. यामुळे माझं टेन्शन खूप वाढलं आणि मी जास्त दारू पिऊ लागलो आणि पत्नीला जास्त त्रास देऊ लागलो. त्या नशेत मी काय करतो ते मला कळत नव्हतं. माझी नशा उतरली की, मी तिची माफी मागायचो. नंतर नंतर माझ्यावर ती विश्वास ठेवायला तयार नव्हती. मी खूप एकटा पडलोय, अशी व्यथा मांडली.

भरोसा सेलमध्ये त्या दोघांचे समुपदेशन केलं. त्याला मानसिक आधार हवा होता आणि तिच्या मनातील आशा कायम ठेवायला हवी होती. ती समुपदेशनातून जागृत करण्यात आली. त्याने भरोसा सेलचा आधार घेत हळूहळू प्रयत्न करत दारू सोडली.

ते समुपदेशनात सांगितल्यानुसार अधूनमधून भेटत होते. एकटं वाटायला लागलं किंवा टेन्शन आलं की, तो किंवा ती येऊन आमच्याशी येऊन बोलायचे. त्यांना दोघांना पाहिजे तेवढा वेळ भारोसाने त्यांना दिला. त्याने नंतर दुसरीकडे भाडे तत्वावर घर घेतले आहे. दोघे आता एकत्र राहत आहेत. त्याने दारू सोडली आहे. तिने त्याला कधीही सोडून न जाण्याचे वचन दिले आहे. ते दोघे खुश आहेतच, पण त्यांच्या मुलाच्या चेहऱ्यावर आनंद दिसतो आहे. त्या दोघांसहित तिच्या घरचे भारोसा सेलवर खूश आहेत.

**सामना** – दि. १५ फेब्रुवारी, २०२०



# व्हॅलेन्टाईन डे निमित्ताने ज्येष्ठांचा वाढदिवस

## दत्तवाडी पोलिसांचा उपक्रम

पुणे : व्हॅलेन्टाईन डे निमित्त सर्वत्र एकमेकांना शुभेच्छा देण्यात सर्वजण व्यस्त असताना दत्तवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवीदास घेवारे यांनी अभिनव उपक्रम राबवत, ज्या वयोवृद्ध नागरिकांना आपला जन्मदिवस माहीत नाही, अशा नागरिकांचा केक कापून वाढदिवस साजरा केला.

जिजाऊ फाउंडेशनच्या सहकार्याने शुक्रवारी सकाळी हा उपक्रम पार पडला. आपल्या वाढदिवसाची तारीख माहिती नसलेल्या या ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस केल्याने त्यांना गहिवरून आले होते. यावेळी फाउंडेशनच्या अध्यक्षा ज्योती ढमाळ यांनी ज्येष्ठ महिला व पुरुष यांना औक्षण केले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवीदास घेवारे यांनी पुणे पोलिसांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू केलेल्या भरोसा सेल, ज्येष्ठ नागरिक कक्ष याची माहिती या वयोवृद्ध नागरिकांना दिली. नागरिकांना पोलीस विभागाची मदत हवी असेल, त्यांच्यासाठी प्राधान्याने सेवा पुरविण्याची हमी दिली. ठाण्याचे श्रीकांत शिरोळे, पोलीस नाईक सोमनाथ यादव, जिजाऊ फाउंडेशनच्या ज्योती ढमाळ, अंबिका कांबळे, अमृता कांबळे, शकुंतला देवकर यांनीही हातभार लावला.

**महाराष्ट्र टाइम्स** – दि. १२ फेब्रुवारी, २०२०

# विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

पुणे : पुणे ग्लोबल स्कूल व ज्युनिअर कॉलेज (मार्केट यार्ड) येथील विद्यार्थिनींना 'गुड टच आणि बॅड टच'बाबत मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी पोलिस निरीक्षक संभाजी निंबाळकर, पोलिस काका चांदगुडे तसेच मुख्याध्यापक स्वाती चावर पाटील, स्वीटी वैराट, कांचन पवार व इतर शिक्षक आणि विद्यार्थी हजर होते.



ग्लोबल इंग्लिश स्कूलमध्ये 'गुड टच आणि बॅड टच'बाबत पोलिसांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

पुण्यनगरी – दि. २२ फेब्रुवारी, २०२०

# तरुणांनी शिवरायांच्या विचारांचे आचरण करावे : डॉ. रवींद्र शिसवे

**पुणे : प्रतिनिधी**

हल्ली तरुणपिढी भरकटली आहे, असे म्हटले जाते. परंतु, सिद्धीविनायक ग्रुपच्या युवकांनी परंपरा व संस्कृतीला साजेशी शिवजयंती साजरी करून एक आदर्श घालून दिला. शिवप्रेरणा ही काळाची गरज असून तरुणांनी शिवरायांचे विचार आचरणात आणले पाहिजे, असे मत सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी व्यक्त केले.

कात्रजच्या सावंत विहार परिसरातील सिध्दीविनायक ग्रूपतर्फे पारंपारिक पद्धतीने शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी युवकांना मार्गदर्शन करताना डॉ. शिसवे बोलत होते. यावेळी काढण्यात आलेली शिवरायांची पालखी, पालखीमधून शिवप्रतिमेसह भगवद्गीता व ज्ञानेश्वरी ग्रंथांची मिरवणूक, भव्य रथातून शिवप्रतिमा मिरवणूक, विद्युत रोषणाई, पद्मनाभ ढोलताशाचे वादन, पारंपारिक वेशातील ३५० महिलांचा सहभाग, मिरवणुकीमध्ये गोंधळी व भूत्यांचा समावेश, तुतारी व तोफांच्या सलामीमुळे कात्रजकरांनी साक्षात शिवकाळ अनुभवला.



सिध्दीविनायक ग्रुपच्या युवकांनी शिवजयंतीच्या दिवशी पहाटे सिंहगड येथून शिवदौडद्वारे शिवज्योत आणली. त्यानंतर भारती हॉस्पिटल आणि मनपाच्या सहकार्याने सकाळी मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन केले. यावेळी आरोग्य शिबीराचे उद्घाटन भारती विद्यापीठाचे बाबा शिंदे यांच्याहस्ते झाले.त्याचा लाभ १२५ नागरिकांनी घेतला. त्यानंतर संध्याकाळी ऐतिहासिक शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन भरवले. यावेळी आमदार लक्ष्मण जगताप, भिमराव तापकीर, तानाजी सावंत आणि नगरसेविक राणीताई भोसले, अमृताताई बाबर, युवराज बेलदरे, अप्पा रेणुसे, वसंत मोरे, तसेच दिगंबर डवरी, प्रभाकर कदम उपस्थित होते.



महिलांशी संवाद साधताना दामिनी पथकाच्या शारदा उमोळे व इतर.

# ‘भरोसा सेलकडे तक्रार दिल्यास त्वरित न्याय मिळेल’

**खडकी : पुढारी वृत्तसेवा**

समाजामध्ये वावरताना काही महिलांना कौटुंबिक तसेच समाजाच्या काही दुष्ट प्रवृत्तीकडून त्रास सहन करावा लागतो. समाजात बदनामी होऊ नये म्हणून महिला हा त्रास सहन करीत असतात. मात्र अशा महिलांनी भरोसा सेल कडे आपली तक्रार केल्यास त्यांना निश्चितच न्याय मिळेल असे मत दामिनी पथकाच्या शारदा उमोळे यांनी व्यक्त केले.

रेंजहिल्स येथील टाइप वन परिसरामध्ये झालेल्या हळदी कुंकू समारंभात उमाळे बोलत होत्या. या प्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शहर अध्यक्षा रुपाली पाटील, स्वराज्य रक्षक संभाजी फ्रेम किरण शेजल, मनीषा आगलावे आदी उपस्थित होत्या.

आज महिला उच्चपदावर कार्यरत आहेत. त्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास त्यांनी ताबडतोब नियंत्रण कक्षाच्या व्हॉट्सअ‍ॅपवर लोकेशन पाठविल्यास त्यांना त्वरित मदत मिळेल.

# वाहतूक पोलिसाचा सत्कार

पुणे : ज्येष्ठ समाजसुधारक रामचंद्रराव वंडेकर यांच्या ५८व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या ऐतिहासिक वंडेकर लायब्ररी हॉलमधील कार्यक्रमात अभिवादन करण्यात आले. या वेळी वाहतूक पोलिस कॉन्स्टेबल गणेश थोपटे यांचा रामचंद्रराव वंडेकर यांचे नातू व विठ्ठलराव वंडेकर फाउंडेशनचे अध्यक्ष धैर्यशील वंडेकर यांच्या हस्ते शाल व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



वाहतूक पोलिस कॉन्स्टेबल गणेश थोपटे यांचा धैर्यशील वंडेकर यांनी शाल व सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला.

'बहुजन व दुर्बलांचे हक्क व अधिकार, शिक्षण, कृषी, सहकार, आरोग्य आदी क्षेत्रांत रामचंद्रराव वंडेकर यांनी केलेले कार्य नव्या पिढीसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक आहे,' असे संस्थेचे संयुक्त सचिव राजेंद्र जगताप म्हणाले. रामचंद्रराव वंडेकर यांचे नातू व विठ्ठलराव वंडेकर फाउंडेशनचे अध्यक्ष धैर्यशील वंडेकर यांनी शाळकरी मुलांना रस्ते वाहतूक व सुरक्षा याविषयी मार्गदर्शन केले.

वंडेकर यांच्या हस्ते वाहतूक पोलिस कॉन्स्टेबल गणेश थोपटे यांचा सत्कार झाला. गेल्या वर्षी थोपटे यांनी मुसळधार पावसात येरवडा येथे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत रस्त्यावर उभे राहून वाहतूक नियोजनाचे कर्तव्य पार पाडले होते. त्याची दखल घेऊन वंडेकर यांनी त्यांचे कौतुक केले.

व्यंकटेश वंडेकर, संस्थेचे खजिनदार जगदीश जेधे, प्राचार्य बी. एम. कड, उपप्राचार्य वांद्रे, के. बी. कोलते, ग्रंथपाल लाटे, सभासद, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. गीता पाटील यांनी सूत्रसंचालन केले.